# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ३०(४)(च), (छ), (ज) व (झ) [30(4)(f), (g), (h) & (i)] नुसार अधिसभेचे सदस्य असलेल्या प्राचार्य, अध्यापक व विद्यापीठ अध्यापक, व्यवस्थापन प्रतिनिधी व नोंदणीकृत पदवीधर यांच्यामधून विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेवर निवडून द्यावयाच्या आठ सदस्यांकरीता निवडणूक**

## निवडणूक सूचना

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ३०(४)(च), (छ), (ज) व (झ) [30(4)(f), (g), (h) & (i)] नुसार दिनांक ११ मार्च, २०२३ रोजी आयोजित केलेल्या अधिसभेच्या बैठकीत अधिसभेचे सदस्य असलेल्या प्राचार्य, अध्यापक व विद्यापीठ अध्यापक, व्यवस्थापन प्रतिनिधी व नोंदणीकृत पदवीधर यांच्यामधून प्रत्येकी दोन सदस्य व्यवस्थापन परिषदेवर सदस्य म्हणून निवडून देण्यासाठी दिनांक १७ मे, २०१७ रोजी महाराष्ट्र शासनाने राजपत्राद्वारे प्रसिध्द केलेल्या सन २०१७ चा एकरुप परिनियम क्रमांक ०१ मधील मुद्दा क्रमांक ०९ (२) नुसार ही निवडणूक सूचना जारी करण्यात येत आहे.**

**१) निवडणुकीच्या एकूण आठ जागा खालीलप्रमाणे :**

- **कलम ३०(४)(च) - प्राचार्य :** दोन जागा पैकी एक खुला व एक अनुसूचित जातीसाठी (SC) राखीव
- **कलम ३०(४)(छ) - अध्यापक व विद्यापीठ अध्यापक :** दोन जागा पैकी एक खुला व एक निरधिसूचित जमाती (*विमुक्त जाती*) किंवा भटक्या जमातीसाठी (DT (*VJ*) / NT) राखीव
- **कलम ३०(४)(ज) - व्यवस्थापन प्रतिनिधी :** दोन जागा पैकी एक खुला व एक अनुसूचित जमातीसाठी (ST) राखीव
- **कलम ३०(४)(झ) - नोंदणीकृत पदवीधर :** दोन जागा पैकी एक खुला व एक इतर मागास प्रवर्गासाठी (OBC) राखीव

**उपरोक्त प्रत्येक प्रवर्गासाठी स्वतंत्रपणे नामनिर्देशन सादर करणे आवश्यक आहे.**

२) **सदर निवडणूक कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील. :**

| अ.क्र. | तपशील | तारीख, वार व वेळ | स्थळ |
|---|---|---|---|
| १ | नामनिर्देशन पत्र सादर करण्याचा अंतिम दिनांक, वार व वेळ | मंगळवार, दि. २८ फेब्रुवारी, २०२३ (वेळ : सायंकाळी ५.०० वाजण्यापूर्वी) | निवडणूक विभाग, प्रशासन भवनासमोर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ७ |
| २ | नामनिर्देशन पत्रांच्या छाननीचा दिनांक, वार व वेळ | बुधवार, दि. ०१ मार्च, २०२३ (वेळ : सकाळी ११.०० वाजता) | निवडणूक विभाग, प्रशासन भवनासमोर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ७ |
| ३ | नामनिर्देशन पत्र मागे घेण्यासंबंधी लेखी कळविण्याचा दिनांक, वार व वेळ | गुरुवार, दि. ०२ मार्च, २०२३ (वेळ : सायंकाळी ५.०० वाजण्यापूर्वी) | निवडणूक विभाग, प्रशासन भवनासमोर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ७ |
| ४ | निवडणुकीचा दिनांक, वार व कालावधी | शनिवार, दि. ११ मार्च, २०२३ कालावधी – एक तास, बैठकीच्या कार्यक्रमपत्रिकेनुसार | संत ज्ञानेश्वर सभागृह, मुख्य इमारत, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ७ |

| अ.क्र. | तपशील | तारीख, वार व वेळ | स्थळ |
|---|---|---|---|
| ५ | मतपत्रिकांची छाननी व मतमोजणीचा दिनांक, वार, वेळ व स्थळ | शनिवार, दि. ११ मार्च, २०२३ (मतदानाची वेळ संपल्यानंतर लगेचच) | संत ज्ञानेश्वर सभागृह, मुख्य इमारत, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ७ |

**३) नामनिर्देशन पत्र तसेच नामनिर्देशन मागे घेण्याचे अर्ज भरण्यासंबंधीच्या सूचना :**

नामनिर्देशन पत्र तसेच नामनिर्देशन मागे घेण्याचे अर्ज विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या संकेतस्थळावरील Nomination of Candidate -> Download Nomination Form या लिंकवर उपलब्ध असून सदर अर्ज डाऊनलोड करुन घेता येईल. नामनिर्देशन पत्र सादर करण्याच्या विहित वेळेपूर्वी विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या संकेतस्थळावर अर्जाचे शुल्क रु. १०००/- (रुपये एक हजार फक्त) ऑनलाईन पध्दतीने भरता येईल. अर्जासोबत संबंधित आवश्यक कागदपत्रे व ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या शुल्काची पावती जोडून असे पत्र निवडणूक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे विहित वेळेत जमा करावेत.

**टिप : ऐनवेळेला ऑनलाईन शुल्क भरताना व्यक्तिगत तांत्रिक समस्या उद्‌भवल्यास व त्यामुळे उमेदवाराला विहित वेळेत नामनिर्देशन पत्र भरता न आल्यास त्याला विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.**

**४) उमेदवारांसाठी आवश्यक पात्रता शर्ती व नामनिर्देशन अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे :**

**कलम ३०(४)(च) - प्राचार्य :**

**अधिसभेचे सदस्य असतील अशा प्राचार्यांमधून अधिसभेने निवडून दिलेले –**

**१. प्राचार्य म्हणून दि. १३ ऑक्टोबर, २००० पूर्वी नियुक्त नसल्यास पीएच.डी. पदवीधारक असावा.**
**२. विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्ष केलेले असावे.**

**नामनिर्देशन अर्जासोबत खालील कागदपत्रांच्या स्वयं-साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. अन्यथा संबंधित नामनिर्देशनपत्र 'अवैध' ठरविण्यात येईल.**

१. नामनिर्देशन शुल्क अदा केल्याची पावती.
२. उमेदवार हा प्राचार्य म्हणून दि. १३ ऑक्टोबर, २००० पूर्वी नियुक्त नसल्यास पीएच.डी. पदवी प्रमाणपत्र.
३. प्राचार्य म्हणून विद्यापीठ मान्यता पत्राची प्रत / प्रती
४. विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाजाचे एकूण किमान पाच वर्षे अनुभवाचे विहित नमून्यातील प्रमाणपत्र.
५. नावात बदल असल्यास शासन राजपत्र किंवा विवाह नोंदणी प्रमाणपत्र.
६. राखीव जागेसाठी उमेदवारास सक्षम अधिकाऱ्याने दिलेल्या जातीच्या प्रमाणपत्राची (Caste Certificate) स्वयं-साक्षांकित प्रत.
७. अधिसभा सदस्य म्हणून निवडून आल्याच्या निवडणूक निकालपत्राची प्रत.

**कलम ३०(४)(छ) - अध्यापक व विद्यापीठ अध्यापक :**

**अधिसभेचे सदस्य असतील अशा, अध्यापक व विद्यापीठ अध्यापक (जे प्राचार्य किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेचे संचालक नाहीत) यांमधून अधिसभेने निवडून दिलेले –**

**१. पीएच.डी. पदवीधारक असावा आणि एकूण किमान दहा वर्षे अध्यापनाचा अनुभव असावा,**
**किंवा**
**एकूण किमान पंधरा वर्षे अध्यापनाचा अनुभव असावा,**
**२. विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्ष केलेले असावे.**

**नामनिर्देशन अर्जासोबत खालील कागदपत्रांच्या स्वयं-साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. अन्यथा संबंधित नामनिर्देशनपत्र 'अवैध' ठरविण्यात येईल.**

१. नामनिर्देशन शुल्क अदा केल्याची पावती.

२. पीएच.डी. पदवी प्रमाणपत्र, ज्या उमेदवाराचा एकूण किमान दहा (१०) वर्षे अध्यापनाचा अनुभव आहे. ज्या उमेदवाराचा एकूण किमान पंधरा (१५) वर्षे अध्यापनाचा अनुभव आहे त्यांना पीएच.डी. पदवी प्रमाणपत्र जोडण्याची आवश्यकता नाही,

३. एकूण किमान दहा (१०) वर्षे / एकूण किमान पंधरा (१५) वर्षे (जे लागू असेल ते) अध्यापनाच्या अनुभवाचे विहित नमून्यातील प्रमाणपत्र.

४. विद्यापीठ मान्यता पत्राची प्रत / प्रती.

५. विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाजाचे एकूण किमान पाच वर्षे अनुभवाचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र.

६. नावात बदल असल्यास शासन राजपत्र किंवा विवाह नोंदणी प्रमाणपत्र.

७. राखीव जागेसाठी उमेदवारास सक्षम अधिकाऱ्याने दिलेल्या जातीच्या प्रमाणपत्राची (Caste Certificate) स्वयं-साक्षांकित प्रत.

८. अधिसभा सदस्य म्हणून निवडून आल्याच्या निवडणूक निकालपत्राची प्रत.

**कलम ३०(४)(ज) - व्यवस्थापन प्रतिनिधी :**

**अधिसभेचे सदस्य असतील अशा व्यवस्थापन प्रतिनिधींमधून अधिसभेने निवडून दिलेले –**

**१. स्नातक पदवीधारक असावा,**
**२. व्यवस्थापनाच्या नियामक मंडळाचा/व्यवस्थापन समितीचा किमान दोन वर्षे सदस्य असावा,**
**३. राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेचे किंवा यथास्थिती राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाचे वैध प्रमाणपत्र असलेले आणि अशा प्रमाणपत्राचा वैधता कालावधी समाप्त झाला नसेल असे किमान एक महाविद्यालय किंवा परिसंस्था अशा व्यवस्थापनाकडून चालविण्यात येणारे असावे,**
**४. ज्यांचा विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या लगतपूर्वीच्या व्यवस्थापन परिषदेवर प्रतिनिधी होता अशा व्यवस्थापनाचा प्रतिनिधी नसावा.**

**नामनिर्देशन अर्जासोबत खालील कागदपत्रांच्या स्वयं-साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. अन्यथा संबंधित नामनिर्देशनपत्र 'अवैध' ठरविण्यात येईल.**

१. नामनिर्देशन शुल्क अदा केल्याची पावती.
२. पदवी प्रमाणपत्र (Degree Certificate).
३. व्यवस्थापनाच्या नियामक मंडळाचा / व्यवस्थापन समितीचा किमान दोन वर्षे सदस्य असल्याचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र.
४. राखीव जागेसाठी उमेदवारास सक्षम अधिकाऱ्याने दिलेल्या जातीच्या प्रमाणपत्राची (Caste Certificate) स्वयं-साक्षांकित प्रत.
५. उमेदवार ज्या व्यवस्थापनाचा प्रतिनिधी असेल त्या व्यवस्थापनाकडून चालविण्यात येणाऱ्या किमान एक महाविद्यालय किंवा परिसंस्थेस प्राप्त राष्ट्रीय मुल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेचे किंवा यथास्थिति राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाचे वैध प्रमाणपत्र ज्याचा वैधता कालावधी समाप्त झाला नाही.
६. नावात बदल असल्यास शासन राजपत्र किंवा विवाह नोंदणी प्रमाणपत्र.
७. अधिसभा सदस्य म्हणून निवडून आल्याच्या निवडणूक निकालपत्राची प्रत.

**कलम ३०(४)(झ) - नोंदणीकृत पदवीधर :**

**अधिसभेच्या निवडून दिलेल्या नोंदणीकृत पदवीधर सदस्यांमधून अधिसभेने निवडून दिलेले –**

**नामनिर्देशन अर्जासोबत खालील कागदपत्रांच्या स्वयं-साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. अन्यथा संबंधित नामनिर्देशनपत्र 'अवैध' ठरविण्यात येईल.**

१. नामनिर्देशन शुल्क अदा केल्याची पावती.
२. पदवी प्रमाणपत्र (Degree Certificate).
३. राखीव जागेसाठी उमेदवारास सक्षम अधिकाऱ्याने दिलेल्या जातीच्या प्रमाणपत्राची (Caste Certificate) स्वयं-साक्षांकित प्रत.
४. नावात बदल असल्यास शासन राजपत्र किंवा विवाह नोंदणी प्रमाणपत्र.
५. अधिसभा सदस्य म्हणून निवडून आल्याच्या निवडणूक निकालपत्राची प्रत.

५) योग्यरितीने भरलेले आणि विहित वेळेपूर्वी सर्व कागदपत्रांसह दाखल केलेले, उमेदवारी अर्जच विचारात घेतले जातील.

६) राखीव जागेसाठी उमेदवाराने सक्षम अधिकाऱ्याने दिलेल्या जातीच्या प्रमाणपत्राची स्वयं-साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

७) नामनिर्देशनपत्रांवर, मत देण्यासाठी हक्कदार असलेल्या दोन अधिसभा सदस्यांकडून दिनांक लिहून स्वाक्षरी करण्यात येईल आणि त्यामध्ये, दिनांक, नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची पूर्ण नावे, पत्ते यांचा समावेश असेल. कोणत्याही व्यक्तीला, त्याने नामनिर्देशन पत्रावर स्वाक्षरी करुन व दिनांक लिहून त्याची संमती दिल्याखेरीज निवडणुकीतील उमेदवार म्हणून नामनिर्देशित केले जाणार नाही. कोणतीही व्यक्ती, त्याच्या स्वतःच्या नामनिर्देशनामध्ये एकतर सूचक किंवा अनुमोदक असणार नाही. परंतु, जेथे तीनपेक्षा कमी मतदार असतील तेथे उमेदवार, त्याच्या नामनिर्देशनामध्ये स्वतः सूचक व अनुमोदक असू शकेल. (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. (१०)(३))

८) एकरुप परिनियम क्र. १ मध्ये नमूद केलेल्या सर्व अटींचे अनुपालन करीत नसलेले नामनिर्देशनपत्र अवैध असेल आणि ते फेटाळले जाईल.

९) उमेदवारास निवडणुकीतून माघार घेण्याचा पर्याय खुला असेल : परंतु, अशा उमेदवारास निवडणुकीच्या वेळापत्रकात विहित केलेल्या दिनांकास सायंकाळी ५ वाजण्यापूर्वी विद्यापीठाच्या कार्यालयात व्यक्तिशः किंवा त्याने लिखित स्वरुपात प्राधिकृत केलेल्या व्यक्तीमार्फत त्याने स्वाक्षरीत केलेला नामनिर्देशन मागे घेतल्याचा अर्ज सादर करावा लागेल. (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. (१०)(५))

१०) जर वैध नामनिर्देशनांची संख्या भरावयाच्या रिक्त पदांच्या संख्येपेक्षा अधिक नसेल तर, निवडणुकीचा निकाल जाहीर करण्याच्या दिनांकास नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांना निवडून आले असल्याचे घोषित करण्यात येईल. (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. (१०)(८))

११) नामनिर्देशन अर्ज मागे घेण्याच्या मुदतीनंतर निवडून द्यावयाच्या जागांपेक्षा जास्त उमेदवार असतील तर अशा उमेदवारांची अंतिम यादी विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

१२) महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २८ एप्रिल, २०१७ व त्या संदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके/पत्रे यांच्या अन्वये विद्यापीठाच्या कोणत्याही अधिकार मंडळावर निवडून येण्यासाठी/नामनिर्देशित होण्यासाठी शासनाने विहित केलेल्या पात्रता शर्ती पूर्ण करणाऱ्या उमेदवारांचेच नामनिर्देशन अर्ज ग्राह्य धरण्यात येतील. शासन राजपत्र, शासनाने यासंबंधी वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके/पत्रे विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या संकेतस्थळावर Act/Statutes व Notifications/ Circulars या लिंकवर उपलब्ध आहे.

१३) नामनिर्देशन अर्ज छाननी आणि मतमोजणीच्यावेळी स्वतः उमेदवार किंवा त्याने लेखी पत्राव्दारे अधिसभा सदस्यांच्या यादीतील मतदार असलेली अधिकृत व्यक्ती प्रतिनिधी म्हणून एक तास अगोदर पूर्वसूचना देऊन ओळखपत्र दाखवून हजर राहू शकेल.

१४) **शनिवार, दिनांक ११ मार्च, २०२३ रोजी संत ज्ञानेश्वर सभागृह, मुख्य इमारत, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे होणा-या अधिसभेच्या बैठकीत संबंधित मतदारांनी मतदान करावयाचे आहे. तथापि, अधिसभा सदस्य म्हणून मतदानाच्या अंतिम दिनांकापर्यंत रिक्त असलेल्या जागेवर मा. अधिसभा सदस्य म्हणून नामनिर्देशित करण्यात आलेल्या व्यक्तीस सदर सभेमध्ये मतदार म्हणून मतदानाचा आपला हक्क बजावता येईल.**

१५) मतदानास येताना मतदारांनी स्वतःचा फोटो असलेले ओळखपत्र उदा. शासकीय / निमशासकीय सेवकांचे कार्यालयीन ओळखपत्र, आधारकार्ड, पारपत्र, वाहन चालविण्याचा परवाना (ड्रायव्हींग लायसेन्स) किंवा सर्वसाधारण निवडणुकीसाठी सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेले फोटोसहित ओळखपत्र किंवा आयकर अधिका-यांनी (Income Tax) दिलेले फोटोसहित ओळखपत्र (PAN Card) किंवा विद्यापीठाने दिलेले ओळखपत्र किंवा तत्सम फोटोसहित ओळखपत्र आणणे आवश्यक आहे. **संबंधित सभासदास / मतदारास ओळखपत्र दाखविल्याशिवाय मतपत्रिका मिळणार नाही.**

१६) ही निवडणूक प्रमाणशीर प्रतिनिधित्व पध्दतीनुसार एकल संक्रमणीय मताद्वारे व परिनियमांव्दारे विहित केल्याप्रमाणे मतपत्रिकांद्वारे घेण्यात येईल. या निवडणुकीसाठी मतदान हे पसंतीनुसार प्राधान्यक्रम या पध्दतीने करावयाचे आहे.

गणेशखिंड, पुणे ४११००७ )
संदर्भ क्र. साफुपुविनि/३०(४)(च),(छ),(ज) व (झ)/१०५ )
दिनांक : १७ फेब्रुवारी, २०२३ )

( डॉ. प्रफुल्ल पवार )
**कुलसचिव**

**प्रत : सर्व संबंधित**